जाहिरातीचा नमुना

**महाराष्ट्र शासन**

अन्न, नागरी व ग्राहक संरक्षण विभाग

सुचना

महाराष्ट्र ग्राहक संरक्षण व मार्गदर्शक निधी नियम, १९९२ मधील परिच्छेद ७ नुसार शासनाकडुन, महाराष्ट्रात ग्राहक चळवळ व ग्राहक जनजागृती क्षेत्रात काम करणा-या तसेच इतर क्षेत्रात काम करणा-या, परंतु ग्राहक चळवळ, ग्राहक जनजागृती कार्याक्रमांचे आयोजन करुन ग्राहकांच्या हक्काचे संरक्षण व संवर्धन कार्य करणा-या नोंदणीकृत संस्थांकडून "सहाय्यक अनुदान" वितरीत करण्यासाठी अर्ज मागविण्यात येत आहे. संबंधित संस्थाकडून पुढील प्रमाणे कार्यक्रम आयोजित करणे अपेक्षित आहे:

१) साईन बोर्ड, भित्ती चित्र, होर्डिंग्ज इ.चा ग्राहक जनजागृतीबाबत स्थानिक भाषांमध्ये संदेश देण्यासाठी गाव मंडई तसेच कृषी /भाजी बाजार अशा प्रमुख ठिकाणी वापर करणे,

२) ग्राहक जनजागृतीबाबत संदेश देण्यासाठी नुक्कड नाटक, पथनाटय, पपेट शोज, रागिणी नौटंकी, पांडवानी, विलु पट्टु, मॅरेथॉन शयर्ती इ. चे आयोजित करणे,

३) राज्य शासनाने सुचित केलेल्या एखादया विषयावर शांळामध्ये प्रदर्शन/ भेसळ प्रतिबंधक शिबिरे आयोजित करणे, इ.

४) स्थानिक कार्यक्रमांमध्ये ग्राहक जनजागृतीसंबंधित सामग्रीचे प्रदर्शन व प्रसार

५) हॅण्डबील्स/पॅम्फ्लेट्सचे प्रकाशन करुन ग्रामिण भागात तसेच शाळेतील विद्यार्थ्यांमध्ये त्याचे वाटप करणे

६) PDS outlet & Vehicles चा सहभाग

या संदर्भात या विभागाच्या **दि.२६ जुलै, २०१७ च्या शासन निर्णयानुसार,** ग्राहक जनजागृती क्षेत्रात काम करणाऱ्या ग्राहक संस्थांव्यतिरिक्त इतर क्षेत्रात काम करणाऱ्या परंतु ग्राहक चळवळीचेही कार्य करणाऱ्या नोंदणीकृत संस्थांना शासनाकडून अनुदान वितरित करणेबाबतच्या मार्गदर्शक सुचना निर्गमित करण्यात आल्या असून, सोबत अर्जाचा नमुनाही देण्यात आला आहे. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharastra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आला आहे.

**अर्ज करणाऱ्या इच्छुक संस्थांनी , विहित नमुन्यातील त्यांचा अर्ज व प्रस्ताव जिल्हाधिकारी कार्यालय, पुणे (पुरवठा शाखा), A विंग ३ रा मजला पुणे,१ कडे, दिनांक २४ जानेवारी २०२० पर्यत कार्यालयीन वेळेत किंवा त्यापुर्वी प्राप्त होतील या बेताने सादर करावा.** विहित मुदतीनंतर प्राप्त झालेल्या अर्जाचा विचार केला जाणार नाही, याची नोंद घ्यावी. तसेच यामध्ये बदल करण्याचे सर्व अधिकार अन्न,नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, मंत्रालय मुंबई यांचेकडे राखून ठेवण्यात आले आहेत.

ठिकाण- पुणे
दिनांक-१५/०१/२०२०

(नवल किशोर राम)
जिल्हाधिकारी पुणे

D:\phulsundar\samitya\Grahak Parishad\3-4-2017

Scanned by CamScanner